# राजकीय भूगोल

## घटक १. राजकीय भूगोलाचा परिचय

# प्रस्तावना:

- राजकीय भूगोल ही मानवी भूगोलाची एक शाखा.
- अलीकडे विकसित झालेला विषय असला तरी राज्याचा अभ्यास अनेक वर्षांपासून.
- 'राजकीय भूगोल' यातील शब्दांप्रमाणे ही शाखा राजकीय घटकांशी संबंधित.
- हे घटक (विभाग) आकार व प्रकार याबाबतीत कमालीचे भिन्न असतात.
- तर काही बाबतीत हे भौगोलिक व राजकीय घटक वैशिष्ट्यपूर्ण असतात.
- उदा. ऑस्ट्रेलिया देश संपूर्ण खंडव्याप्त तर ग्रेट ब्रिटन, जपान इ. देश बेटीय
- सामान्यत: राजकीय घटक हे अंशतः किंवा पूर्णतः मानवनिर्मित सरहद्दींनी वेढलेले असतात.
- अशा देशांच्या सरहद्दींना भौगोलिक आधार नसतो मात्र भौगोलिक दृष्ट्या महत्त्वाचे होतात कारण ते तेथील संस्कृती व लोकांच्या उद्योगाने प्रभावित होतात.
- राजकीय भूगोल हा राष्ट्राराष्ट्रांच्या दरम्यान असलेल्या अन्योन्य प्रक्रियांशी संबंधित असलेला विषय.
- जेव्हा राष्ट्राराष्ट्रांतील वादांचा विचार करतो तेव्हा त्या वादात भूगोल असलेला दिसून येतो.
- कारण प्रत्येक राष्ट्राच्या विविध गोष्टींवर भौगोलिक घटकांचा परिणाम होतो.

# ऐतिहासिक आढावा:

- सुरुवातीचा राजकीय भूगोल शास्त्रज्ञ म्हणून ग्रीक तत्त्ववेत्ता अॅरिस्टॉटलचा उल्लेख केला जातो. त्याने सुप्रसिद्ध 'Polities' या ग्रंथात आदर्श राज्याची (देश) संकल्पना मांडली होती. त्यात त्याने लोकसंख्या व भूप्रदेशाचे स्वरूप हे राज्याचे महत्त्वाचे घटक मानले होते.
- ग्रीक तत्त्वज्ञ स्ट्रॅबोच्या मते राज्य हे भव्य आकाराचे असते.
- रोमन साम्राज्याच्या ऱ्हासानंतर भूगोल अध्ययनाच्या अंधकार युगास प्रारंभ. या १००० वर्षाच्या काळात राजकीय भूगोलाच्या क्षेत्रात कोणताही विकास नाही.
- मात्र, याकाळात अरब वैज्ञानिक इब्न खाल्दूनने राजकीय भूगोलात मोलाचे कार्य केले.
- १६ व्या शतकाच्या प्रारंभी भूगोल अभ्यासाने जोर धरला. त्याकाळात बोडीनने देशाची राष्ट्रीय वैशिष्ट्ये ही हवामान व प्राकृतिक रचनेने निश्चित होतात, असे प्रतिपादन केले.
- माँटेस्क्युने थंड हवामान हे स्वातंत्र्य व लोकशाहीला अनुकूल असते, असे प्रतिपादन केले. या आधारे त्याने राजकीय भूगोलाचा वैश्विक नमुना सादर केला.

- १८ व्या व १९ व्या शतकात अनेक विचारवंतांनी राजकीय भूगोलाच्या अध्ययनात पूर्वीच्या संकल्पनांचा आधार घेतला.
- यामध्ये कार्ल रिटर यांचा उल्लेख करता येईल.
- रॅटझेल यांच्या प्रेरणेने आधुनिक राजकीय भूगोल अस्तित्वात आला. त्याच्या मते राज्य (State) व जीव (Organism) यांच्यात खूपशी साम्यता आहे. ज्यांच्यासाठी एका भूखंडाची गरज असते.
- मॅकिंडर हासुद्धा पर्यावरण निश्चयवादाने प्रभावित झाला. त्याने हृदयस्थल सिद्धांत मांडताना सागरी सामर्थ्याचे युग संपले असून भूशक्ती आता पुढे येत आहे, असे प्रतिपादन केले.
- दुसऱ्या महायुद्धापूर्वी राजकीय भूगोल हे मोठ्या प्रमाणात जागतिक संघर्ष आणि देशाच्या धोरणावर परिणाम करणाऱ्या गोष्टींशी संबंधित होते.
- १९६८ मध्ये बियान बेरी यांनी सांगितल्याप्रमाणे पर्यावरण निश्चयवाद व शीत युद्ध काळात राजकीय सीमा गोठवण्याच्या क्रिया झाल्यामुळे त्याकाळात राजकीय भूगोलाचे महत्त्व कमी झाले.

- याकाळात इतर क्षेत्रात संख्यात्मक विज्ञान, वर्तनात्मक अध्ययन आणि प्रादेशिक दृष्टीकोन या सारखे नवीन दृष्टीकोन त्या विषयांना संशोधनात्मक बळ देत होते. पण त्याकडे राजकीय भूगोल शास्त्रज्ञांनी दुर्लक्ष केल्यामुळे राजकीय भूगोलाचे स्वरूप केवळ वर्णनात्मक राहिले.

अशा प्रकारे राजकीय भूगोल संकल्पनांचा विकास होत जाऊन १९ व्या शतकात याचे मोठ्या प्रमाणात अध्ययन होऊ लागले व राजकीय भूगोल ही मानवी भूगोलाची एक स्वतंत्र शाखा म्हणून उदयास आली व विकसित झाली.

# राजकीय भूगोल- व्याख्या:

१. **हार्टशोर्न** - 'मानवाचे वसतिस्थान असलेल्या पृथ्वीवरील इतर घटकांच्या संबंधाने स्थान व स्थानाच्या विविध राजकीय वैशिष्ट्यांचा अभ्यास म्हणजे राजकीय भूगोल होय.'

२. **फिट्झर्लंड** - 'राजकीय भूगोल म्हणजे राज्यांचे स्वरूप, त्यांचा विस्तार, त्यांच्या संघटनांचा आणि त्यांच्या परस्पर संबंधावरील परिणामांशी आणि भूगोलाच्या स्थितीशी जुळते घेण्याचे अध्ययन होय.'

३. **पाउंड्स** - 'राजकीय भूगोल हे राजकीयदृष्ट्या संघटीत क्षेत्रे, त्यांची साधनसंपत्ती, विस्तार आणि त्यांनी मानलेल्या विशिष्ट भौगोलिक स्वरुपाची कारणे यांच्याशी संबधित शास्त्र होय.'

४. **जॅकसन** - 'राजकीय भूगोल हे राजकीय वैशिष्ट्यांशी संबधित असलेले, त्याचप्रमाणे संघटनांच्या सरंचनेचे अध्ययन करणारे शास्त्र आहे.'

५. **व्हिटालसे** - 'राजकीय भूगोलाचे क्षेत्र राजकीय असून एखाद्या क्षेत्राची भूवैशिष्ट्ये, तेथील हवामान व नैसर्गिक साधनांशी संबंधित राजकीय दृष्टीने अभ्यास करणारे शास्त्र होय.'

## १.२ राजकीय भूगोलाचे स्वरूप व व्याप्ती:

१. **वर्णनात्मक स्वरूप-** सुरुवातीच्या काळात राजकीय भूगोलाचे स्वरूप वर्णनात्मक होते. राज्य, भूप्रदेश व राज्य सत्ता यांच्याशी संबंधित प्राकृतिक भूगोल आणि लष्करी व राजकीय परिणाम यांचे वर्णन केले जात असे.

२. **सहसंबंधात्मक स्वरूप-** नंतरच्या काळात राजकीय भूगोल हा मानवी क्रिया व संघटना आणि नैसर्गिक पर्यावरण यांच्यातील परस्परसंबंधांचे अध्ययन करणारा विषय म्हणून ओळखला जात होता. त्यावेळी राजकीय भूगोलांतर्गत मानवाच्या क्रिया व संघटना आणि पृथ्वीच्या स्थिती (भौगोलिक परिस्थिती, प्राकृतिक वैशिष्ट्ये, हवामान इ.) यांमधील संबंध नियंत्रण, प्रभाव, प्रतिकूल किंवा जुळत्या स्वरूपाच्या पद्धतीचे होते. कॅमिल व्होलॉक्सच्या मते, राजकीय भूगोलाची समस्या म्हणजे राजकीय संस्थांचे जीवन हे काही अंशी नैसर्गिक चौकटीत असते किंवा त्यात त्यांचा विकास होतो. मृदा, हवा, पाणी हे घटक माणसाच्या सामुदायिक व राजकीय क्रियांवर प्रभाव टाकतात.

**३. क्षेत्रीय स्वरूप-** त्यानंतरच्या काळात राजकीय भूगोलात राजकीय वैशिष्ट्यांच्या क्षेत्रीय भिन्नतेचे व समानतेचे अध्ययन केले जाऊ लागले. या क्षेत्रीय भिन्नतेचा अभ्यास प्राकृतिक, जैविक किंवा सांस्कृतिक संबंधाचा असतो. पृथ्वीवरील विविध क्षेत्रे (प्रदेश) राजकीय संघटनात्मक म्हणून उदयास आल्याने राजकीय भूगोलाला क्षेत्रीय स्वरूप प्राप्त झाले, आणि सध्या याच पद्धतीने किंवा स्वरूपातून अध्ययन होत आहे.

**४. वैविध्यपूर्ण स्वरूप-** कॅस्परेन व मिंघी (१९६९) यांच्या मते, राजकीय भूगोल हे राजकीय घटनांच्या क्षेत्रीय पृथ:करणाचे अध्ययन होय. या व्याख्येमुळे राजकीय भूगोलात अनेक विषय समाविष्ट झाले. सामाजिक शास्त्राच्या सैद्धांतिक व प्रात्यक्षिक या प्रमुख प्रवाहांशी संबंध प्रस्थापित होतो. या प्रकारे राजकीय भूगोलातील अनेक विषयांच्या अध्ययनाने या विषयाला वैविध्यपूर्ण स्वरूप प्राप्त झाले.

## राजकीय भूगोलाची व्याप्ती/अभ्यास क्षेत्र/विषय सामग्री:

- एखाद्या विषयाची व्याप्ती म्हणजे त्यात अभ्यासले जाणारे किंवा समाविष्ट असलेले विषय होय.

आज कोणत्याही पातळीवर कोणतीही राजकीय घटना किंवा कोणत्याही राजकीय संघटनेची क्षेत्रीय बाजू ही राजकीय भूगोलाच्या दृष्टीने महत्त्वाचा विषय समजला जातो. तथापि, राजकीय भूगोलाची व्याप्ती मोठी असून ती पुढीलप्रमाणे.

१. राज्य व राष्ट्र संकल्पना

२. राज्याचे स्थान, स्थिती, आकार व विस्तार

३. राज्याच्या भौगोलिक स्थितीचा राज्यसंस्थेवर होणारा परिणाम

४. सीमा, सरहद्दी आणि त्यामुळे निर्माण होणारा वाद

५. राज्य, लोकसंख्या व शासन

६. लोकसंख्या स्थलांतर, स्थलांतर विषयक धोरणे

७. राज्यातील साधनसंपत्ती, तीचा विकास व सामर्थ्य

८. वाहतूक, दळणवळण

९. विदेशी व्यापार व व्यापारी धोरण

१०. राजधान्यांची ठिकाणे व त्यांची स्थिती

११. लष्करी डावपेच व विदेशी धोरण

पाउंड्स या तज्ञानुसार राजकीय भूगोलाची व्याप्ती पुढीलप्रमाणे.

**१. राज्य व राष्ट्र भौगोलिक एकरूपता -** राज्याच्या सीमा, सरहद्दी, सीमावाद, राज्यांच्या हक्काचा प्रदेश, राज्यातील विविध सामाजिक घटक, राज्याबाहेरील सामाजिक घटक.

**२. साधनसंपत्ती -** राज्याच्या दृष्टीने संपत्ती महत्त्वाची असून त्यावर राज्याचा विकास अवलंबून असतो. यामध्ये खनिज, ऊर्जा, जल व वन या संपतींचा समावेश होतो. ही संपत्ती लोककल्याणासाठी उपयुक्त असल्याने तिचे रक्षण, संवर्धन, विकास किंवा योग्य विनियोग ही कार्ये राज्यसंस्थेकडे असतात.

**३. लोकसंख्या -** राज्यासाठी लोकसंख्या महत्त्वाची असून त्यावरच राज्याची निर्मिती होते. लोकसंख्येवर राज्याचा विकास अवलंबून असून शेती, उद्योगधंदे, लष्कर इ.साठी मनुष्यबळ आवश्यक असते. लोकसंख्या ही राष्ट्राची मोठी शक्ती असून तिचे स्थलांतर, भाषा, धर्म इ. अध्ययन केले जाते.

**४. देशाचे एकत्रीकरण -** देशामध्ये विविध लोक, जाती, धर्म, वंश, भाषा, चालीरीती असतात तसेच भूरचना, हवामान यांत भिन्नता असते. या सर्व घटकांत एकसंधता, ऐक्य व सलोखा ठेवणे हे राज्याचे कर्तव्य असते. यांचाही अभ्यास केला जातो.

**५. विदेशी व्यापार -** जगातील कोणताही देश स्वयंपूर्ण नसतो. देशातील अपुऱ्या साधनांमुळे लोकांच्या गरजा भागविण्यासाठी इतर देशांशी व्यापार-संबंध प्रस्थापित करावे लागतात. कोणताही देश अतिरिक्त माल निर्यात करतो तर आवश्यक माल आयात करतो. ही देवाणघेवाण देशादेशांतील मैत्रीच्या संबंधातून अधिक सुलभ होते. अर्थात त्यास भौगोलिक परिस्थितीची (समुद्र किनारा, बंदरे, अंतर्गत वाहतूक, निर्माण होणारा माल इ.) अनुकूलता आवश्यक असते. या सर्वांचे अध्ययन केले जाते.

**६. राष्ट्राची भूमिका -** राज्याच्या दृष्टीने राष्ट्रीय भूमिका किंवा दृष्टीकोन महत्त्वाचा आहे. यांत प्रत्येक देश इतर देशांशी कशा प्रकारे संबंध प्रस्थापित करतो हे महत्त्वाचे असते. अर्थात अशा संबंधावर तेथील प्राकृतिक परिस्थिती, सीमा, सरहद्दींचे स्वरूप यांचा प्रभाव पडतो. राजकीय भूगोलातील हा अभ्यास महत्त्वाचा आहे.

# राजकीय भूगोलाचे दृष्टीकोन:

कोणत्याही विषयाच्या अध्यापनात सुसूत्रता आणण्यासाठी अभ्यासाचे काही दृष्टीकोन असतात त्यास अभ्यासपद्धती असेही म्हणतात.

**१. सत्ता पृथक्करण दृष्टीकोन (The Power Analysis Approach)-** या दृष्टीकोनात राजकीय विभाग (क्षेत्र) राजकीय सत्तेच्या दृष्टीकोनातून स्पष्ट केले जातात. या अनुषंगाने राष्ट्रीय शक्ती ही भौगोलिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय व लष्करी शक्ती अशा पाच भागात विभागली जाते. राज्य किंवा राज्यसंस्था एक शक्ती असलेला घटक समजला जातो. यानुसार परस्परसंबंधांचे अध्ययन सत्ताविषयक दृष्टीकोनातून होते.

**२. ऐतिहासिक दृष्टीकोन (Historical Approach)-** वर्तमानकालीन राजकीय समस्या समजून घेण्यासाठी भूतकालीन बाबींवर प्रकाश टाकला जातो. एखाद्या देशाची राजकीय प्रगती कशी झाली या संदर्भाने देशाच्या प्रगतीचा क्रम हा प्राकृतिक व सांस्कृतिक पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून पहिला जातो. तथापि, सध्या राज्यात काय आहे? आणि पूर्वी काय होते? हे या अभ्यासाने स्पष्ट होते. अशा प्रकारे ऐतिहासिक राजकीय भूगोलाचा अभ्यास कोणत्याही सध्य राजकीय घडामोडी व बाबींच्या बदलाचे व प्रगतीचे स्वरूप पाहण्यास उपयुक्त असते.

**३. स्वरूप शास्त्रीय दृष्टीकोन (Morphological Approach)-** या दृष्टिकोनानुसार राजकीय विभागांचा अभ्यास त्यांचे प्रारूप (Pattern) व रचना (Structure) या दोन वैशिष्ट्यांच्या अनुषंगाने होते. प्रारूप हे स्थान (Site), आकार (Size) व आकृती (Shape) या तीन गोष्टींच्या संदर्भाने देश, राज्य वा प्रशासकीय विभागांची मांडणी दर्शविते. तर रचना हे लोकसंख्या, आर्थिक विभाग, राजधान्यांची ठिकाणे, सीमा, अविकसित अथवा वादग्रस्त भागाच्या राजकीय घटकांसंबंधीचे वैशिष्ट्ये होय. अशा प्रकारे या दृष्टीकोनाच्या अभ्यासात राज्याच्या सीमा, सरहद्दी, सीमाप्रदेश राज्याचे स्थान, विस्तार, राजधान्या, लोकसंख्या, आर्थिक गाभा क्षेत्र इ. गोष्टींचा समावेश होतो.

**४. कार्यात्मक दृष्टीकोन (Functional Approach)-** ही संकल्पना हार्टशोन यांनी मांडली. प्रत्येक राजकीय भाग हा उपभागात विभागला जातो. या प्रत्येक भागाचे विशिष्ट शासकीय कार्य असते. या उपभागांचे इतर भागांशी किंबहुना देशाशी अधिक मजबूत असे शासकीय असे संबंध हवेत. राज्याचे कार्य योग्य तऱ्हेने चालण्यासाठी उपभागात ऐक्य पाहिजे. राज्याच्या ऐक्यासाठी एकसंधता (Unity), सुसंगतता (Coherance), स्थिरता (Viability) ह्या मुलभूत व आवश्यक गोष्टी आहेत.

स्थिरता किंवा सफलक्षमता ही आर्थिक व राजकीय डावपेच आणि इतर राज्यांशी असलेले संबंध यांवर अवलंबून असते. यादृष्टीने राज्याचे कार्य महत्त्वाचे. राज्याचे कार्य नागरिकांसाठी आर्थिक स्थिरता निर्माण करणे असून या कार्यास चालना देण्यासाठी विदेशी व्यापाराचे कायदे, त्या संबंधीचे अनुदान इ. गोष्टी कराव्या लागतात.

सुरक्षिततेचा विचार करता राजकीय डावपेच, इतर देशांशी असलेले राजकीय संबंध, करार, लष्करी सामर्थ्य उभारणे व वाढविणे इ. कार्यांचा समावेश होतो. या सर्वांचा अभ्यास कार्यात्मक दृष्टीकोनातून केला जातो.

**५. वर्तनात्मक दृष्टीकोन (Behavioural Approach)-** हा एखाद्या राज्याच्या वर्तनक्रियेच्या अभ्यासाशी संबंधित आहे. एखाद्या राज्याचे वर्तन दुसऱ्या राज्याशी सलोख्याचे, राज्य बळकावण्याचे, बचावाचे असू शकते. मतदान प्रक्रियेचे क्षेत्रीय वर्तन उदा. मतदार संघाचे स्थान, उमेदवार, मतदार, कर्मचारी वर्ग, मतदान पद्धती, साहित्य पुरवठा, प्रत्यक्ष मतदान क्रिया, निकाल इ. एक प्रकारचे वर्तनच आहे. या सर्व वर्तनांचा अभ्यास वर्तनात्मक दृष्टीकोनातून केला जातो.

**६) रचनात्मक दृष्टीकोन (Systematic Approach)-** रचनात्मक दृष्टीकोन सामान्य सैद्धांतिक रचनेतून आला आहे. यात विषयाच्या आराखड्याच्या ऐक्यावर भर दिला जातो. राजकीय घडामोडी व सामाजिक रचना हे जागा (Place), क्षेत्र (Area) व भूचित्र (Landscape) या भौगोलिक क्षेत्राचे घटक आहेत. या भौगोलिक क्षेत्राच्या राजकीय क्रियेतून विविध संघटना निर्माण होतात, ज्या रचनाबद्ध असतात. उदा. पंचायत राजव्यवस्थेत ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद आणि गाव, तालुका, जिल्हा, प्रशासकीय विभाग, राज्य, देश अशी रचना असते. यांचा राजकीय भूगोलात रचनात्मक दृष्टीने अभ्यास होतो.

**७. वास्तव दृष्टीकोन (Factual Approach)-** या अध्ययनात राज्यातील निरनिराळ्या गोष्टी समजून घेण्यासाठी तेथे प्रत्यक्ष असलेल्या स्थितीचा विचार केला जातो.

**८. सांख्यिकी दृष्टीकोन (Statistical Approach)-** राज्यातील विविध घटक, त्यांची संख्या, मतदार-उमेदवार वगैरेंच्या संदर्भात आकड्यांना महत्त्व आहे.

# राजकीय भूगोलाचे महत्त्व:

अलीकडे जगातील राजकीय घडामोडी पाहता राजकीय भूगोलाच्या अध्ययनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

**विविध संकल्पनांचे अध्ययन-** राज्य, राष्ट्र, देशाचे स्थान, स्थिती, सीमा, सरहद्दी, संसाधन संघर्ष, विस्थापनाचे राजकारण यांसारख्या संकल्पना समजतात.

**भौगोलिक घटकांचे महत्त्व-** राज्य व राजकीय सत्ता यांवर भौगोलिक घटकांचा खूप मोठा प्रभाव पडतो. भौगोलिक घटकांचे मानवी विकासातील महत्त्व आधोरेखित होते.

**राजकीय सत्तेचे महत्त्व-** लोकशाही, हुकुमशाही, राजेशाही इ. सत्तांचे प्रकार व त्यांची वैशिष्ट्ये लक्षात येतात. राजकीय सत्तेचे, मतदानाचे मानवी विकासातील महत्त्व लक्षात येते.

**लोकसंख्या विकास-** राज्यासाठी लोकसंख्या महत्त्वाची असून तिच्या विकासासाठी संसाधनांचा योग्य वापर व विनियोग करून लोकसंख्या विकास साधता येतो.

**संघर्षाचे मूळ समजते-** विविध राष्ट्रांमधील सीमावाद, पाणीवाटप विवाद इ.ची कारणे व परिणाम अभ्यासता येतात.

**उपाययोजना -** विविध संघर्षांची मूळ कारणे लक्षात आल्यास त्याच्यावर उपाय शोधून विवाद टाळता किंवा संपवता येतो.

राजकीय भूगोल, नागरिक-राज्य संबंध आणि सामाजिक परिवर्तने समजण्यासाठी विविध सामाजिक चळवळींची गतिशीलता व भौगोलिक फरक आणि त्यांचे औपचारिक संस्थांशी असलेले घनिष्ठ संबंध यावर अधिक लक्ष देऊन योगदान वाढवू शकते.